गांवकरी
www.gavakari.net
18 Jul 2025 - Page 7
नाशिक, शुक्रवार, दि. १८ जुलै २०२५

# 'मविप्र'ची सायबरवारी..नाशिकच्या गोदातीरी..

## सीएमसीएस महाविद्यालयात कलात्मक सादरीकरण

**नाशिक : प्रतिनिधी**

युवकांमधील सोशल मीडियाचे वाढते प्रमाण, फोटो मॉर्फिंगचा चुकीचा वापर, ओटीपीद्वारे होणारी फसवणूक, बँक-फायनान्स घोटाळे व ठकबाजी या प्रकारांपासून नागरिकांना सावध करण्यासाठी मविप्र सीएमसीएस महाविद्यालयाच्या २० सायबर वॉरियर्सनी आषाढी एकादशीवर आधारित 'सायबरवारी' हा उपक्रम राबविला. गोदाघाटासह नाशिकच्या धार्मिक परिसरात विठ्ठल-रुक्मिणी आणि वारकरी बांधवांची वेशभूषा करून सुमारे एक हजार नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांना जागरूक करत सायबर सुरक्षेचा संदेश देण्यात आला.

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत मविप्रच्या सीएमसीएस महाविद्यालयातील सायबर वॉरियर्सनी अनोख्या पद्धतीने कलात्मक सादरीकरण केले. प्राचार्य डॉ. मधुकर शेलार, प्रकल्प समन्वयक प्रा. स्वाती तपकिरे, क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, संचालक अजय शिर्के, समन्वयक गायत्री केसकर व दीपू सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. उपस्थित नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या कलात्मक सादरीकरणाचे कौतुक करत भविष्यातील उपक्रमांना शुभेच्छा दिल्या. साहिल सोनवणे, हर्षदा बोरसे, अंजली दाऊद, हितेश बाबिस्कर, उपासना मंडळे, केवळ कोळी या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



**नाशिक : गोदाघाट परिसरात 'सायबरवारी' हा अनोखा उपक्रम राबविताना मविप्र सीएमसीएस महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स.**

### भजन-कीर्तनातून जागर

वेगवेगळे नाट्यप्रयोग, पोस्टर, भजन व कीर्तन, पोवाडे, कविता या माध्यमातून सायबर फसवणुकीच्या महत्त्वाच्या प्रकरणांची माहिती जनतेसमोर प्रभावीपणे सादर केली. सायबर सुरक्षेचे विविध पैलू, पासवर्डचे महत्त्व, फिशिंगपासून बचाव, डिजिटल व्यवहार सतर्कता, सायबर क्राइम हेल्पलाइन क्रमांक १९३० याबद्दलची माहिती दिली. प्रत्येक सादरीकरणातून डिजिटल सुरक्षिततेचा एक महत्त्वाचा मुद्दा प्रभावीपणे मांडण्यात आला. अशाप्रकारे अनोखा उपक्रम राबवून नागरिकांना सायबर साक्षर करणारे हे एकमेव महाविद्यालय असल्याचे यावेळी सांगण्यात आले.